खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### करिअर कट्टा : सेंटर ऑफ एक्सलन्स सन्मान

# राजगुरू महाविद्यालयाला 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रमाणपत्र



राज्य सरकारच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रमाणपत्र देत पहिल्या टप्प्यात २५ महाविद्यालयांचा गौरव करण्यात आला.

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास राज्य सरकारच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रमाणपत्र व एक लाख रुपयांचा धनादेश उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

पुण्यात आयोजित कार्यक्रमात पहिल्या टप्प्यात २५ महाविद्यालयांचा गौरव करण्यात आला. या प्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, करिअर कट्टा उपक्रमाचे प्रमुख यशवंत शितोळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, करिअर कट्टा समन्वयक डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सैनवणे, प्रा. दिनेश बिराडे, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. सागर थेऊरकर, विद्यार्थी संसदप्रमुख प्रिया वडेकर यांनी प्रमाणपत्र व धनादेशाचा स्वीकार केला.

राज्य सरकारच्या वतीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या सर्व शाखांचे विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले आहेत. याची उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साह्यता केंद्राच्या वतीने दखल घेऊन 'सेंटर ऑफ एक्सलन्स' प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

My Gramin Edition
Sep 12, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

केसरी
राष्ट्रीय ठेवा

# राजगुरू महाविद्यालयास सेंटर फॉर एक्सलन्स प्रमाणपत्र



राजगुरूनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयास राज्य सरकारच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स प्रमाणपत्र व एक लाख रुपयांचा धनादेश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

याप्रसंगी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, करिअर कट्टा उपक्रमाचे प्रमुख यशवंत शितोळे उपस्थित होते.

या कार्यक्रमात पहिल्या टप्प्यात २५ महाविद्यालयांचा गौरव करण्यात आला. प्राचार्य डॉ शिरीष पिंगळे, करिअर कट्टा समन्वयक डॉ. संजय शिंदे, डॉ. कैलास सोनवणे, प्रा. दिनेश बिराडे, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. सागर थेऊरकर विद्यार्थी संसद प्रमुख प्रिया वडेकर यांनी प्रमाणपत्र स्वीकारले.

राज्य सरकारच्या वतीने महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी करिअर कट्टा हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या सर्व शाखांचे विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले आहेत. संस्था अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर यांनी सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**